# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

---

**दिनांक २४.०९.२०२६ गुरूवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २३.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये १८ केसेसमध्ये १८ ईसमावर कारवाई करून एकुण ६१,९२०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०३ केसेसमध्ये १५ इसमांवर कारवाई करून एकुण ३,३७,०३९/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच, दिनांक २३.०९.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २४.०९.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ५८ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ५२ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ३४ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये १६८ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २२३ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये २४ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये १४९ केसेस, ड्रायव्हींग विदाऊन युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ०३ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ७० केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०९ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये ३१ केसेस, विटाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४बी(१) मोवाका अन्वये २४ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये २,०३० केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे ०२ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये ३० केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण २,९४२ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. १०,९२,१००/—रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा सामाजीक सुरक्षा विभाग पोलीसांची कामगिरी :— ओयो चिन्हाचा अनधिकृतपणे वापर करणाऱ्या वेगवेगळ्या हॉटेल व लॉज मालक आरोपीविरूध्द गुन्हे दाखल.**

फिर्यादी श्री. नरेंद्र सुरेश खारवे, वय ४२ वर्षे, रा. मानिकबाग, सिंहगड रोड, पुणे हे ओयो हॉटेल्स ॲण्ड होम्स प्रा. लिमी. या कंपनीमध्ये नोडल अधिकारी म्हणुन कार्यरत आहेत. ओयो ब्राण्ड व लोगो बनावट बनवुन त्याचा दुरूपयोग करणाऱ्या विरूध्द कायदेशिर कारवाई करण्यासाठी कंपनीने त्यांना अधिकृत केलेले आहे. त्यांनी दिलेल्या सुचनेवरून, दिनांक २३.०९.२०२६ रोजी, गुन्हेशाखा सामाजीक सुरक्षा विभाग पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी १) पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील, ओयो हॉटेल 'आनंद इन', विहीरगांव, उमरेड रोड चा

मालक नामे खुशाल विठ्ठलराव वाडेकर, ओयो हॉटेल 'स्पॉट ऑन फक्त तु आणि मी', माता नगर, बहादुरा, नागपुर चा मालक नामे चेतन मोतीराम चरडे, ओयो हॉटेल 'एस के हरी' टेलीफोन नगर, उमरेड रोड, नागपुर चा मालक नामे प्रज्वल हरीचंद्र कांबळे, २) पोलीस ठाणे सोनेगांव हद्दीतील हॉटेल ए वाय इम्पेरियल आणि हॉटेल ओयो एअरपोर्ट इम्पेरियल चा चालक अनिकेत प्रेमदास कुतरमारे, ३) पोलीस ठाणे वाडी हद्दीतील ओयो के टु चा चालक नामे पवन खोब्रागडे, ४) पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीतील हॉटेल चंद्रा इन चा मालक नामे सोनु मंडल, ५) पो. ठाणे सिताबर्डी हद्दीतील हॉटेल फ्लॅगशिप द वे हॉटेल चा मालक सौरभ शदर यादव, ६) पो. ठाणे इमामवाडा हद्दीतील हॉटेल क्रॉसरोड रूम्स चा मालक ऋषभ शरद नंदवंशी, ७) पो. ठाणे बेलतरोडी हद्दीतील हॉटेल ओ किंग्स इन चा मालक नामे मिथीलेश सोनटक्के, ८) पो. ठाणे जुनी कामठी हद्दीतील हॉटेल हायवे इन चा मालक अक्षय वाघमारे, ९) पो. ठाणे यशोधरानगर हद्दीतील हॉटेल कॉन्टीनेंटल इन चा मालक नामे यश चहांदे, १०) पो. ठाणे पाचपावली हद्दीतील हॉटेल गॅलक्सी स्टे इन चा मालक ऋषीराज चौकसे, यांनी ओयो कंपनीचे चिन्ह लोगोचा अनधिकृत वापर स्वतःचे आर्थीक फायद्याकरीता व्यवसायीक वापर केला. तसेच, मा. पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांच्या ओयो कंपनीचे हॉटेल संदर्भातील परीपत्रकातील अटींचे उल्लंघन केले. आरोपींचे हे कृत्य कलम ३४५(३), ३४७(१), २२३ भा.न्या.सं., सहकलम १०३, १०४ व्यापार चिन्ह् अधिनीयम १९९९ अन्वये होत असल्याने, फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून संबंधीत पोलीस ठाणे येथे आरोपींविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दर्शन पाटील व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे बजाजनगर :– हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक २४.०९.२०२६ चे ०१.१५ ० वा. चे सुमारास, बजाजनगर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत कोम्बींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, शाहु किराणाजवळ, दंतेश्वरी वस्ती येथे एक हद्दपार इसम फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, एक इसम पोलीसांना पाहुन पळुन जाण्याचे प्रयत्नात असतांना, त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव रोहीत उर्फ चाकु धन्नु वर्मा वय २६ वर्षे रा. दंतेश्वरी झोपडट्टी, वेस्ट हायकोर्ट रोड, नागपूर असे सांगीतले. आरोपीचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ३७३७/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले.

आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी मपोशि रानी कराडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बजाजनगर येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे तहसील :– चोरी करणाऱ्या दोन आरोपींना अटक.**

फिर्यादी इस्लाम शेख वल्द शेख सिराजुल वय ५७ वर्ष रा. टिमकी, शारदा मंदीरचे बाजुला, तहसील, नागपूर यांचे पोलीस ठाणे तहसील हद्दीत मोमीनपुरा, अमनउल्ला मस्जिदचे बाजुना आयत ज्वेलर्स नावाचे सराफा दुकाना आहे. दिनां २१.०९.२०२६ चे १२.२० वा. ते २२.०९.२०२६ चे १८.३० वा. चे दरम्यान आरोपी १)

शोयेब अकरम अन्सारी वय २६ वर्ष रा. धनवा पोस्ट बरसोड ता. बरी जि. हजारीबाग, झारखंड ह.मु. हॉटेल आलिशान, रुम क्र. २०३, मोमीनपुरा, नागपूर व २) ऐनुल जेठुमिया अन्सारी वय ३५ वर्ष रा. एसबी हाऊसिंग, बलाजी नगर, बहादुरा नागपूर यांनी फिर्यादीचे ज्वेलरी शॉपमध्ये येऊन दागिने खरेदी करण्याचे बहाण्याने दागिने पाहता पाहता, फिर्यादीची नजर चुकवुन असली सोन्याचे दागिने चोरी करुन त्याजागी बनावट बेन्टेक्सचचे दागिने ठेऊन फिर्यादीचे दुकानातुन १,८९,०००/— रु. चे वेगवेगळे सोन्याचे दागिने चोरुन नेले. सदर बाब फिर्यादीचे लक्षात आल्याने फिर्यादीने आरोपी क्र. १ यास पकडून पोलीसांना सुचना व तक्रार दिल्याने तहसील पोलीस ठाणे सपोनि सुशांत भगत ८३९०१५४२२८ यांनी आरोपींविरुध्द कलम ३०५,३(५) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंदवून दोन्ही आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास सुरु आहे.

**<u>३) पोलीस ठाणे तहसील :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक २३.०९.२०२६ चे १९.३० वा. चे सुमारास, तहसील पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना गांधीबाग गार्डनचे भिंतीला लागुन सार्वजनिक रोडवर एक इसम संशयीतरित्या दिसल्याने, त्याचेजवळ जात असता, तो पोलीसांना पाहून पळाल्याने, त्याचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव मोहम्मद खतिब अब्दुल गफुर वय २७ वर्षे, रा. तकीया दिवाणशाह, काला झंडा, मोमीनपुरा, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आत कंबरेत मागील बाजुस एक लोखंडी मोठी चाकु किंमती ३००/—रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे तहसील येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

<u>वाहतुक शाखा प्रेसनोट— १</u>

नागपूर शहरात दरवर्षी प्रमाणे यावर्षी दिनांक २५.०९.२०२६ ते दि. २६.०९.२०२६ पावेतो गणेश मुर्तीचे विसर्जन करण्यात येणार आहे. श्री. गणेश मुर्तीचे विसर्जन शहरातील कोराडी तलाव, पोलीस तलाव, गोरेवाडा रिंगरोड, कच्छीविसा मैदान, फुटाळा तलाव, गांधीसागर तलाव, सक्करदरा तलाव, सोनेगाव तलाव या ठिकाणी कृत्रीम तलाव (टॅंक) निर्माण करून त्यामध्ये करण्यात येणार आहे. गणेश विसर्जनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी होवून वाहतूकीची समस्या निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वाहतूक सुरळीत राहावी व सामान्य नागरीकांना धोका गैरसोय किंवा अडथळा निर्माण होवू नये म्हणून वाहतूकीचे नियमन व नियंत्रण करण्याचे दृष्टीने अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली आहे.

<u>वाहतूक परिमंडळ इंदोरा :— कोराडी तलाव :—</u>

**१) परिमंडळ क्र. १ व २** या मार्गाने येणारे सार्वजनिक मंडळाचे गणपती हे सावरकर नगर चौक— आठ रस्ता चौक— लक्ष्मीनगर चौक— बजाजनगर चौक— शंकरनगर चौक— लक्ष्मीभवन चौक—कॅफे हाऊस चौक—लॉ कॉलेज

चौक– लेडीज क्लब चौक– जापानी गार्डन चौक– जुना काटोल नाका चौक– पोलीस तलाव– पागलखाना चौक– मानकापुर चौक–कोराडी नाका– कारेमोरे चौक–वंजारी भवन चौक–कोराडी तलाव येथे विसर्जनाकरीता जातील. मुर्ती विसर्जनानंतर याच मार्गाने परत येतील.

**२) परिमंडळ क्र. २ व ४** या मार्गाने येणारे सार्वजनिक मंडळाचे गणपती हे अजनी नाका चौक– कृपलानी चौक– राहाटे कॉलनी चौक–मॉरीस कॉलेज चौक–संविधान चौक–एम.एस.इ.बी. वाय पॉईन्ट–छावणी वाय पॉईन्ट–पागलखाना चौक– मानकापुर चौक–कोराडी नाक– कारेमोरे चौक–वंजारी भवन चौक–कोराडी तलाव येथे विसर्जना करीता जातील. मुर्ती विसर्जनानंतर याच मार्गाने परत येतील.

**३) परिमंडळ क्र. ३** या मार्गाने येणारे सार्वजनिक मंडळाचे गणपती हे टेलीफोन एक्सचेंज चौक–अग्रसेन चौक–दोसर भवन चौक– मेयो हॉस्पिटल समोरून उड्डाणपुल मार्गे एल.आय.सी.चौक–लिबर्टी चौक–छावणी वाय पॉईन्ट– पागलखाना चौक– मानकापुर चौक–कोराडी नाका– कारेमोरे चौक–वंजारी भवन चौक–कोराडी तलाव येथे विसर्जनाकरीता जातील. मुर्ती विसर्जनानंतर याच मार्गाने परत येतील.

**४) परिमंडळ क्र. ५** या मार्गाने येणारे सार्वजनिक मंडळाचे गणपती हे ऑटोमोटिव्ह चौक–कपील नगर चौक–तथागत चौक– खोब्रागडे चौक– मार्टीन नगर उड्डाणपुल–मानकापुर चौक–कोराडी नाक– कारेमोरे चौक–वंजारी भवन चौक–कोराडी तलाव येथे विसर्जनाकरीता जातील. मुर्ती विसर्जनानंतर याच मार्गाने परत येतील.

**५)** नागपूर ग्रामीण भागातुन विसर्जनाकरीता येणारे गणपती नांदा फाटा मार्गे येवुन कोराडी तलाव येथे विसर्जनाकरीता येतील व मुर्ती विसर्जन करून याच मार्गाने परत जातील.

**वाहतूक परिमंडळ सदर :– पोलीस कृत्रिम तलाव**

**१) परिमंडळ क्र. १, २, ३** या मार्गाने येणारे सार्वजनिक मंडळाचे गणपती हे लिबर्टी चौक–छावणी वाय पॉईन्ट–दुर्गा मंदीर छावणी – जूना काटोल नाका चौक – पोलीस तलाव

**वाहतूक परिमंडळ सदर :– गोरेवाडा कृत्रिम तलाव**

**१) परिमंडळ क्र. १,२,३,** या मार्गाने येणारे सार्वजनिक मंडळाचे गणपती हे लिबर्टी चौक–छावणी वाय पॉईन्ट–दुर्गा मंदीर छावणी – जूना काटोल नाका चौक – गिटटीखदान चौक – बोरगाव चौक – गोरेवाडा चौक – गोरेवाडा कृत्रिम तलाव

**२) परिमंडळ क्र. ५, ६** या मार्गाने येणारे सार्वजनिक मंडळाचे गणपती हे मानकापूर चौक – झिंगाबाई टाकळी पूलीया चौक –गोरेवाडा चौक – गोरेवाडा कृत्रिम तलाव

३) मानकापूर चौकातून गोरेवाडा चौक मार्गे नवीन काटोल नाका कडे जाणारी वाहतूक आवश्यकते प्रमाणे गोरेवाडा चौकातून डावे वळन घेवुन, बोरगाव चौक, गिटटीखदान चौक डावे वळन घेवुन नवीन काटोल नाका मार्गे जातील

**वाहतूक परिमंडळ लकडगंज :– कच्छीविसा कृत्रिम तलाव**

**१) परिमंडळ क्र. ३, ४ व ५** या मार्गाने येणारे सार्वजनिक मंडळाचे गणपती हे वैष्णोदेवी चौक – वर्धमान नगर चौक – आंबेडकर चौक – कच्छीवीसा कृत्रिम तलाव. तसेच, टेलीफोन एक्सचेंज चौक –छापरू नगर चौक – आंबेडकर चौक –कच्छीवीसा कृत्रिम तलाव. तसेच पावर हाउस चौक –सूदर्शन चौक –कच्छीवीसा कृत्रिम तलाव

**वाहतूक परिमंडळ सिताबर्डी :– फुटाळा कृत्रिम तलाव**

**१)** पुर्व नागपूर हद्दीतील सि.ए. रोडने फुटाळा तलाव येथे विसर्जनास येणाऱ्या श्रीगणेश मुर्ती रामझुला मार्गे जयस्तंभ चौक–श्री मोहिनी कॉम्पलेक्स–एलआयसी चौक– लिबर्टी टी पॉईन्ट– सि.के.नायडु चौक– सदर पोलीस ठाणे–जपानी गार्डन चौक– वेस्टर्न कोलफिल्ड कार्यालय–दुध डेअरी–तेलंगखेडी हनुमान मंदिर ते फुटाळा तलाव या मार्गाचा वापर करतील.

**२)** वायुसेना कमांड प्रवेशद्वारकडुन फुटाळा तलाव या मार्गावरील सर्व प्रकारची वाहतूक आवश्यकतेनुसार टि.व्ही. टॉवर, डब्ल्युसीएल बिल्डींग, जपानी गार्डन अशी वळविण्यात येईल तसेच, तेलंगखेडी मंदिर कडुन फुटाळा तलाव कडे जाणारी वाहतूक ही तेलंगखेडी गार्डन, रविनगर चौक मार्गे जातील.

**३)** व्हेरायटी चौककडून फुटाळा तलाव येथे विसर्जनास येणाऱ्या श्रीगणेश मुर्ती महाराजबाग चौक–भोले पेट्रोल पंप चौक– लॉ कॉलेज चौक–रविनगर चौक– भरतनगर चौक येथुन फुटाळा तलाव या मार्गाचा वापर करतील.

**४)** कॅम्पस चौक ते फुटाळा तलाव वडाचे झाडापर्यंतचे मार्गावरील जाणारी व येणारी सर्व प्रकारचे वाहतुकीवर आवश्यकतेनुसार निर्बंध घालण्यात येत आहे.

**५)** फुटाळा वस्तीतील एकुण ०६ गल्ल्यामधुन फुटाळा तलाव कडे येणारे सर्व प्रकारचे वाहतुकीस आवश्यकता नुसार तात्पूरत्या स्वरूपात बंद करण्यात येत आहे.

**६)** अमरावती रोडने नागपूर कडे येणारी इतर वाहतूक आवश्यकते प्रमाणे मारूती सेवा मोटर्स येथुन डावीकडे वायुसेना मार्गे किंवा कॅम्पस चौक येथुन उजवीकडे अंबाझरी टी पॉईंट मार्गे जातील.

**७)** नागपूर कडून अमरावती कडे जाणारी सर्व वाहतूक ही आवश्यतेनुसार वळविण्यात येईल.

**वाहतूक परिमंडळ कॉटन मार्केट :–**

**१) फुटाळा कृत्रिम तलाव :–** कोतवाली, तहसील, गणेशपेठ व इतर पोलीस ठाणेचे हद्दीतून गांधीसागर मार्गे सुभाष रोडने फुटाळा तलाव येथे विसर्जनासाठी येणाऱ्या सार्वजनिक मंडळाचे गणपती आग्याराम देवी, कॉटन मार्केट चौक, लोहापूल, मानस चौक, मॉरीस कॉलेज चौक, व्हेरायटी चौक, महाराजबाग चौक अमरावती रोड, या मार्गाचा वापर करतील.

**२) गांधी सागर तलाव (कृत्रिम तलाव) :–**

**अ)** इतवारी भागातून येणाऱ्या घरगुती गणपती अग्रसेन चौक, चिटणीस पार्क चौक मार्गाने गांधी गेट महाल कडून टिळक पुतळा ते गणेश चौक, गणेश मंदीर या मार्गाचा वापर करतील.

**ब)** गांधीसागर तालव येथे तयार करण्यात आलेले कृत्रिम तलावात घरगुती गणपती विसर्जन करिता येत असल्याने, आग्याराम देवी चौक ते गणेश मंदिर कटींग तसेच, मॉडल मिल चौक ते मौलाना नातिक चौक व टिळक पुतळा चौक ते गणेश मंदिर कटींग कडे जाणाऱ्या सर्व वाहतुकीवर बंदी घालण्यात येत आहे.

**क)** सदर ची वाहतूक मॉडल मिल चौकातील वाहतूक राम कुलर व जाधव चौकाकडे वळविण्यात आली आहे. तसेच आग्याराम देवी चौकतील वाहतूक जाधव चौक व रमन सायंस पार्क कडे वळविण्यात येत आहे. तसेच, मौलाना नातिक चौकातील व टिळक पुतळा चौकतील वाहतूक रमन सायंस पार्क कडे वळविण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे इतवारी, अग्रसेन चौक मार्गे येणाऱ्या घरगुती गणपती बडकस चौकाकडून येणाऱ्या घरगुती गणपती विसर्जनासाठी चिटणीस पार्क चौक येथे आल्यामुळे या ठिकाणी विसर्जन मिरवणुकांची मोठया प्रमाणात गर्दी होत असते. मिरवणुकांच्या गर्दीवरील नियंत्रण ठेवण्याकरीता **चिटनीस पार्क चौक ते मौलाना नातिक चौक** या मार्गाचा वापर करतील.

**वाहतूक परिमंडळ सक्करदरा :– सक्करदरा कृत्रिम तलाव**

अ) बॉलीवुड पाईंट ते फायर ब्रिगेड पर्यंत चा तलाव समोरील रस्ता सर्व प्रकारचे वाहनास येणे–जाणेस बंद राहील. फक्त नागरिकांना पायदळ प्रवेश करता येईल. या रस्त्यावर सुर्वे नगर आणि बिडीपेठ कडे जाणारे दोन रस्ते आहेत. या रस्त्याने येणारे लोक सुध्दा वळुन अयोध्या नगर आणि ज्ञानेश्वर उद्यान या रस्त्यावर सरळ जातील.

ब) छोटा ताजबाग ते भांडे प्लॉट व भांडे प्लॉट ते छोटा ताजबाग कडे येणारी वाहतुक ही आवश्कतेप्रमाणे वळविण्यात येत आहे.

क) तुकडोजी पुतळा कडून भांडे प्लॉट चौकाकडे जाणरी वाहतूक आवश्कतेप्रमाणे छोटा ताजबाग कडून डावे वळण, सक्करदरा चौक, उजवे वळण भांडे प्लॉट चौक असे जातील. तसेच भांडे प्लॉटकडुन तुकडोजी पुतळ्याकडे जाणारी वाहतूक ही भांडे प्लॉट चौकातुन सरळ सक्करदरा चौक, छोटा ताजबाग चौक, उजवे वळण तुकडोजी चौक या मार्गाचा वापर करावा.

ड) ज्ञानेश्वर उद्यांनाकडून जाणारा बसेश्वर पुतळा ते संजुबा शाळा चौक हा रस्ता सर्व प्रकारचे वाहनांस खुला राहील

**वाहतूक परिमंडळ सोनेगांव :— सोनेगाव कृत्रिम तलाव**

या तलावावर विसर्जनासाठी येणाऱ्या गणपती मंडळचा मार्ग सावरकर चौक येथून खामला चौक, सहाकार नगर, सोनेगांव तलाव असा राहील आणि विसर्जनानंतर सर्व रिकामी वाहने याच मार्गाने परत जातील. वस्तीमध्ये जाणारे वाहन चालक हे भेंडे ले आउट या मार्गाने जातील.

**सदर अधिसूचना दिनांक २५.०९.२०२६ चे सकाळी ०६.०० वा. ते दिनांक २७.०९.२०२६ रोजी सकाळी ०६.०० वाजे पर्यंत अमंलात राहील.**

वरील प्रकारचे निर्बंध हे अत्यावश्यक सेवेत असलेल्या शासकीय वाहनांना लागू राहणार नाही. या व्यतिरिक्त परिस्थितीनुसार व आवश्यकतेनुसार योग्य मार्गाने वाहतूक वळविण्याचे अधिकार कर्तव्यावरील पोलीस अधिकाऱ्याना देण्यात येत आहेत.

सर्व नागरिकांना विनंती करण्यांत येते की, सुलभ वाहतुकीकरिता आणि वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये म्हणून उपरोक्त प्रमाणे काढण्यांत आलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याकरिता सहकार्य करावे आणि आपली होणारी गैरसोय टाळावी.

## वाहतुक शाखा प्रेसनोट— २

नागपूर शहरात दरवर्षी प्रमाणे यावर्षी दिनांक २५.०९.२०२६ ते दि. २६.०९.२०२६ पावेतो गणेश मुर्तीचे विसर्जन करण्यात येणार आहे. श्री. गणेश मुर्तीचे विसर्जन शहरातील कोराडी तलाव, पोलीस तलाव, गोरेवाडा रिंगरोड, कच्छीवीसा मैदान, फुटाळा तलाव, गांधीसागर तलाव, सक्करदरा तलाव, सोनेगव तलाव या ठिकाणी कृत्रीम तलाव (टॅंक) निर्माण करून त्यामध्ये करण्यात येणार आहे. गणेश विसर्जनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी होवून वाहतूकीची समस्या निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या अनुषंगाने दिनांक २५ व २६.०९.२०२६ रोजी नागपूर शहरातील गणपती मंडळाचा मिरवणुकीचे व विसर्जनाचे मार्गावर **ट्रॅव्हल्स बसेसला** निर्बंध करणे आवश्यक आहे. वाहतूक सुरळीत राहावी व सामान्य नागरीकांना धोका गैरसोय किंवा अडथळा निर्माण होवू नये, म्हणून वाहतूकीचे नियमन व नियंत्रण करण्याचे दृष्टीने अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली आहे.

**नागपूर शहरातील गणपती मंडळाची मिरवणुक व विसर्जनाचे मार्ग खालील प्रमाणे आहे.**

१) छत्रपती चौक— अजनी नाका चौक— कृपलानी चौक— रहाटे चौक— लोकमत चौक— पंचशील चौक— झासीराणी चौक— व्हेरायटी चौक— मॉरेस कॉलेज चौक— झिरो माईल चौक— संविधान चौक— एम.एस.ई.बी वाय पॉईंट— लिबर्टी चौक

२) आग्याराम देवी चौक— कॉटन मार्केट चौक— मानस चौक— मॉरेस कॉलेज— झिरो माईल चौक— संविधान चौक— एम.एस.ई.बी वाय पॉईंट— लिबर्टी चौक

३) वर्धमाननगर चौक– आंबेडकर चौक– छापरू चौक– टेलिफोन एक्सचेंज चौक– चंद्रशेखर आझाद चौक– गांधीपुतळा चौक– अग्रसेन चौक– गितांजली चौक– दोसर भवन चौक– उड्डान पुलावरून एल.आय.सी. चौक– लिबर्टी चौक

४) कॅम्पस चौक– भरत नगर चौक– रवि नगर चौक– लॉ कॉलेज चौक– भोले पेट्रोल पंप चौक– महाराजबाग चौक– व्हेरायटी चौक– मॉरेस कॉलेज चौक

५) लिबर्टी चौक– कॅफे हाउस चौक– मेश्राम पुतळा चौक– छावणी वाय पॉईंट– पागलखाणा चौक– कल्पना टॉकीज चौक– मानकापूर चौक.

६) ऑटोमोटिव्ह चौक– इंदोरा चौक– कडबी चौक– गडडीगोदाम चौक– एल.आय.सी.चौक– संविधान चौक– झिरो माईल चौक– मॉरेस चौक

- **नागपुर शहरातील वरील दिलेल्या येणाऱ्या व जाणाऱ्या मार्गावर सर्व ट्रॅव्हल्स बसेसला निर्बंध घालण्यात येत आहे. नमुद मार्गाचा वापर कोणतेही ट्रॅव्हल्स बसेस करणार नाही.**

**सदरील अधिसूचना दिनांक २५ व २६.०९.२०२६ रोजी सांयकाळी ०६.०० वा. ते रात्री १२.०० वा. पर्यंत अमंलात राहील.**

वरील प्रकारचे निर्बंध हे अत्यावश्यक सेवेत असलेल्या शासकीय वाहनांना लागू राहणार नाही. या व्यतिरिक्त परिस्थितीनूसार व आवश्यकतेनूसार योग्य मार्गाने वाहतूक वळविण्याचे अधिकार कर्तव्यावरील पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात येत आहेत.

सर्व नागरिकांना विनंती करण्यांत येते की, सुलभ वाहतुकीकरिता आणि वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये, म्हणून उपरोक्त प्रमाणे काढण्यांत आलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याकरिता सहकार्य करावे आणि आपली होणारी गैरसोय टाळावी.

## वाहतुक शाखा प्रेसनोट– ३

नागपूर शहरात दरवर्षी प्रमाणे यावर्षी दिनांक २५.०९.२०२६ ते दि. २६.०९.२०२६ पावेतो गणेश मुर्तीचे विसर्जन करण्यात येणार आहे. श्री गणेश मुर्तीचे विसर्जन शहरातील कोराडी तलाव, पोलीस तलाव, गोरेवाडा रिंगरोड, कच्छीवीसा मैदान, फुटाळा तलाव, गांधीसागर तलाव, सक्करदरा तलाव, सोनेगव तलाव या ठिकाणी कृत्रीम तलाव (टॅक) निर्माण करून त्यामध्ये करण्यात येणार आहे. गणेश विसर्जनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी होवून वाहतूकीची समस्या निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या अनुषंगाने दिनांक २५ व २६.०९. २०२६ रोजी नागपूर शहरात **जड वाहनांना** प्रवेश बंदी करणे आवश्यक आहे. वाहतूक सुरळीत राहावी व सामान्य नागरीकांना धोका गैरसोय किंवा अडथळा निर्माण होवू नये म्हणून वाहतूकीचे नियमन व नियंत्रण करण्याचे दृष्टीने अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली आहे.

**सर्व प्रकरच्या जड वाहनांना नागपूर शहरात प्रवेश बंदी करण्यात येत असुन, त्यांना खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

१) वर्धा चंद्रपूर कडून नागपूर मार्गे छिदवाडा भोपालकडे जाणारे जड वाहन बुटटीबोरी– डोंगरगाव मार्गाने सरळ जामठा, ऑक्सीजन बर्ड पार्क डावे वळन घेउन आउटर रिंग रोडने झिरो सर्कल, खडका टोल नाका, गोंडखैरी, कळमेश्वर, सावनेर मार्गे छिंदवाडा भोपालकडे जातील व येतांना याच मार्गाने वापर करतील.

२) अमरावती कडून छिंदवाडा भोपाल कडे जाणारे जड वाहन गोंडखैरी कडून डावे वळन घेउन कळमेश्वर, सावनेर मार्गे छिंदवाडा भोपाल कडे जातील व येतांना याच मार्गाने वापर करतील.

३) उमरेड, भंडारा, किंवा जबलपूर कडून छिंदवाडा भोपालकडे जाणारे जड वाहन आउटर रिंग रोड वरून आशा हॉस्पीटल जवळून डावे वळन घेउन खापरखेडा मार्गे दहेगाव टि–पॉईन्ट उजवे वळन घेवून सावनेर मार्गे छिंदवाडा, भोपाल कडे जातील व येतांना याच मार्गाने वापर करतील.

४) नागपूर कडून सावनेर मार्गे छिंदवाडा भोपाल कडे जाणारी जड वाहन मानकापूर चौकातून उजवे वळन घेउन जरीपटका चौक, ऑटोमोटिव्ह चौक, उपल्लवाडी देवी मंदीर, आशा हॉस्पीटल, खापरखेडा, दहेगाव सावनेर मार्गे छिंदवाडा, भोपाल कडे जातील व येतांना याच मार्गाने वापर करतील.

- **नागपुर शहरात संपूर्ण जड वाहनांना प्रवेश बंदी राहील. वाहन चालकांनी नागपूर शहराचे बाहेरील आऊटर रिंग रोड चा वापर करावा.**
- **ज्या जड वाहनांना शहरात निर्बंधित वेळेत परवानगी देण्यात आली आहे, त्या जड वाहनांना नागपुर शहरात प्रवेश बंदी राहील.**

**सदर अधिसूचना दिनांक २५.०९.२०२६ चे सकाळी ०६.०० वा. ते दिनांक २७.०९.२०२६ रोजी सकाळी ०६.०० वाजेपर्यंत अमंलात राहील.**

वरिल प्रकारचे निर्बंध हे अत्यावश्यक सेवेत असलेल्या शासकीय वाहनांना लागू राहणार नाही. या व्यतिरिक्त परिस्थितीनूसार व आवश्यकतेनूसार योग्य मार्गाने वाहतूक वळविण्याचे अधिकार कर्तव्यावरील पोलीस अधिकांऱ्याना देण्यात येत आहेत.

सर्व नागरिकांना विनंती करण्यांत येते की, सुलभ वाहतुकीकरिता आणि वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये म्हणून उपरोक्त प्रमाणे काढण्यांत आलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याकरिता सहकार्य करावे आणि आपली होणारी गैरसोय टाळावी.

**स्वा/–**

**(आदित्य मिरखेलकर, भापोसे.)**

पोलीस उप आयुक्त,वाहतूक,

नागपूर शहर.